लोकमत

Lokmat

Printed from Lokmat epaper, Published on Friday, August 23, 2013, Lokmat Hello Mumbai Page No. 5

A A A << Back to Headlines Next >>

# डोळ्यांवर पट्टी बांधून मूर्ती घडवण्याची कला



Enlarge Image

मुंबई : 'अगले बरस आना है' असे म्हणत काहीच दिवसांवर येऊन ठेपलेल्या बाप्पाच्या आगमनाचे वेध सर्वांनाच लागले आहेत. लहानग्यांपासून थोरांपर्यंत प्रत्येक जण लाडक्या बाप्पाची रूपे, त्याच्या निरनिराळ्या नावांच्या प्रेमात असतात. याच धर्तीवर रमा शहा यांनी तेरा वर्षांत तब्बल २,१२,000 गणेशमूर्ती साकारण्याचा विक्रम केला आहे. या विक्रमाची नोंद लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये झाली आहे.

मुंबई येथील सायन विभागात राहणाऱ्या रमा शहा यांनी गणपती बाप्पाच्या प्रेमापोटी गणपतीची विविध रूपे साकारण्याचा ध्यास घेतला आहे. मंत्रोच्चार करत, कोणत्याही साच्याचा वापर न करता आणि डोळ्यांवर पट्टी बांधून गणपती साकारण्याची कला त्यांनी लीलया अवगत केली आहे. त्यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेदरम्यान पत्रकारांना हे गणपतीमूर्तींचे प्रात्यक्षिकही पाहायला मिळाले.

गणेशभक्त रमा शहा यांच्या नावावर तब्बल २७ वेगवेगळे आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार आणि विक्रम आहेत. शहा यांचे कलागुण मोठे बाप्पा बनविण्यापासून ते एका इंचाचे बाप्पा घडविण्यापर्यंत दिसून येतात. वयाच्या १९ व्या वर्षापासून त्यांनी गणेशमूर्ती घडविण्याचा छंद जोपासला आहे. गणेशोत्सव काळातील उंच मूर्तीच्या स्पर्धेत आपल्या कलेतून 'उत्सवा'चे पावित्र्य राखण्याचा संदेश देण्याची इच्छा रमा शहा यांनी 'लोकमत'शी बोलताना व्यक्त केली.

त्याचप्रमाणे उत्सवाच्या बदलत्या स्वरूपाचे भान गणेश मंडळांनी राखले पाहिजे. जेणेकरून त्या उत्सवातील भक्ती, श्रद्धा भाविकांपर्यंत पोहोचेल, असे शहा यांनी सांगितले.भविष्यातही गणेशमूर्ती घडविण्याच्या क्षेत्रात वेगवेगळे प्रयोग करण्याचीही इच्छा त्यांनी यावेळी व्यक्त केली. (प्रतिनिधी) डोळ्यांवर पट्टी बांधून गणपतीची मूर्ती साकारताना रमा शहा.

<< Back to Headlines Next >> A A A